# तेजोमय नववर्षाचा अरुणोदय

१ जानेवारी, २०२०

आत्मीय वाचकांनो,

नूतन वर्षाभिनंदन!

वर्षाच्या या पहिल्या दिवशी तुमच्यापैकी प्रत्येकाला नमस्कार जेव्हा या पहिल्या दिवसाचा अरुणोदय, पृथ्वीच्या सभोवताली चोवीस तासाची यात्रा पूर्ण करतो आहे! न्यूझीलंड देशाच्या पूर्व किनाऱ्यानजिक स्थित खडकाळ चॅथम बेटावरील सूर्योदयाने प्रत्येक नवीन अरुणोदयाचा आरंभ होतो आणि मग एक हजार मैल प्रति तासाच्या [सोळाशे किलोमीटर प्रति तास] वेगाने तो पश्चिमेकडे सरकतो, त्या दिशेने जिथे *तुम्ही* राहता आणि त्याच्याही पलीकडे. ती म्हण ‘*time flies*’ म्हणजेच की, ‘काळ वेगाने पुढे सरकतो’ ही अगदी खरी आहे!

आणि दिवस जर इतक्या वेगाने पुढे सरकत असतील, तर असा विचार करणे सर्वथा उचित ठरेल की, या तेजोमय नववर्षाचा सर्वाधिक उपयोग आपण कशा प्रकारे करणार आहोत.

भारतीय ऋषिमुनी वारंवार ठामपणे असे प्रतिपादन करत आले आहेत की, वेळेचा सर्वश्रेष्ठ उपयोग हा आहे की, आपला बोध आपल्या अंतरात विद्यमान असलेल्या परमात्म्याच्या उपस्थितीकडे पुन्हापुन्हा वळवत राहणे.

सिद्धयोगी असण्याच्या नात्याने हे साध्य करण्याचा सर्वात उत्तम मार्ग आहे त्या नववर्ष संदेशामध्ये सक्रियतेने निमग्न होणे, जो संदेश श्रीगुरुमाई आपल्याला प्रत्येक वर्षाच्या आरंभी प्रदान करतात. तुमचा जर का असा मानस असेल की, तुम्हाला थेट श्रीगुरुमाईंकडून एखादी शिकवण मिळावी, अशी एखादी शिकवण मिळावी की, जी *केवळ तुमच्यासाठी असेल,* तर हे जाणून घ्या की, वर्ष २०२०साठी असलेला श्रीगुरुमाईंचा संदेश हीच, *ती शिकवण आहे!*

तेव्हा माझी तुम्हाला मनःपूर्वक अशी सूचना आहे की, तुम्ही वर्ष २०२०साठीच्या श्रीगुरुमाईंच्या संदेशाचा पूर्णपणे अंगीकार करावा. गुरुमाईंच्या संदेशाचे अध्ययन करावे. त्याला प्रत्यक्ष आचरणात आणावे. हा संदेश कशा प्रकारे *आपल्यासाठीच* आहे, याचे रसास्वादन करावे. गुरुमाईंचा संदेश त्यांच्या आशीर्वादांनी अणुप्राणित आहे आणि या संदेशाचे अध्ययन व अभ्यास केल्याने आपण आत्मानुभूतीमध्ये अधिक सखोलतेने अवस्थित होतो.

मी तुमच्यासाठी काही व्यावहारिक मार्गांचा उल्लेख इथे करतो, ज्यांच्या माध्यमातून तुम्ही येणाऱ्या या वर्षासाठी असलेल्या श्रीगुरुमाईंच्या संदेशाचे आपले अध्ययन सुरू करू शकता.

## *मधुर सरप्राइझ्* मध्ये सहभागी व्हा

तुम्ही ज्यावेळी हे शब्द वाचत असाल, त्यावेळी श्रीगुरुमाईंकडून वर्ष २०२०साठी असलेली त्यांची शिकवण प्राप्त करण्याची आपल्यापैकी अनेकांची मनोकामना पूर्ण झालेली असेल — नववर्ष दिनी आयोजित होणाऱ्या 'मधुर सरप्राइझ्'च्या थेट प्रक्षेपणाच्या दरम्यान वर्ष २०२०च्या श्रीगुरुमाईंच्या संदेशाचा अनुभवदेखील आपण घेतलेला असेल! कृपाप्रसादाने पूरित अशा या सत्संगात सहभागी होणे हा निश्चितच नववर्ष आरंभ करण्याचा *सर्वाधिक* शुभ असा मार्ग आहे. आणि त्यानंतर काही वेळातच, *मधुर सरप्राइझ्* हा सत्संग वेबकास्टच्या स्वरूपात सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर उपलब्ध करण्यात येईल, ज्यामध्ये आपल्याला हवे तितक्या वेळा सहभागी होता येईल!

'मधुर सरप्राइझ्'मध्ये सहभागी होणे हा आपल्यापैकी प्रत्येकासाठी महत्त्वपूर्ण अभ्यास आहे, कारण गुरुमाईंच्या नववर्ष संदेशाच्या प्रवचनातील प्रत्येक शब्द हा *चैतन्यमय* आहे म्हणजेच शक्तीने अनुप्राणित आहे, त्या रूपांतरणकारी शक्तीने जी आपल्याला स्वतःच्या खऱ्या स्वरूपाप्रति जागरूक करते की, आपण परम आत्मा आहोत. त्यामुळेच, श्रीगुरुमाई जेव्हा बोलतात, तेव्हा सिद्धयोग विद्यार्थी असण्याच्या नात्याने आपण स्वतःला श्रवणात पूर्णपणे निमग्न करून सर्वाधिक आत्मसात करू शकतो. गुरुमाईंच्या शब्दांना आपल्या अस्तित्वाच्या प्रत्येक स्तरावर आपण जेव्हा स्थापित होऊ देतो, तेव्हा त्यांच्या शिकवणी आपल्याला इतक्या मोठ्या प्रमाणात प्राप्त होतात की, ज्याचे वर्णन शब्दात करणे केवळ अशक्य आहे.

या दृष्टिकोनातून पाहिले, तर *मधुर सरप्राइझ्* मध्ये सहभागी होणे हा स्वतःच एक असा अभ्यास आहे, जो आपल्याला गुरुमाईंच्या कृपेमध्ये तल्लीन करतो. म्हणूनच मी वर्षभरात अनेकदा *मधुर सरप्राइझ* मध्ये सहभागी होतो. आणि प्रत्येक वेळी त्यात भाग घेताना माझ्या मनाला नवीन अंतर्दृष्टींचा आणि बोधांचा अनुभव येतो आणि माझ्या संपूर्ण अस्तित्वाला ताजेतवाने झाल्यासारखे वाटते. तुम्हीदेखील असे करावे यासाठी मी तुम्हाला प्रोत्साहित करतो! *मधुर सरप्राइझ्*च्या 'एक से अधिक बार प्रतिभागिता पैकेज'साठी पंजीकरण करून तुम्ही हा संकल्प दृढ करू शकता.

## श्रीगुरुमाईंच्या नववर्ष संदेशाचा सक्रियपणे अभ्यास करा

श्रीगुरुमाईंच्या नववर्ष संदेशाच्या रूपांतरणकारी शक्तीची अनुभूती आपण घेतो — सिद्धयोग मार्गावर आपल्या श्रीगुरूंकडून प्राप्त झालेल्या शिकवणीचे सक्रियपणे अध्ययन करून, त्यावर मननचिंतन करून व त्याचा अभ्यास करून व आपल्या दैनंदिन जीवनात त्या शिकवणीला कार्यान्वित करून. याची सुरुवात करण्यासाठी काही सूचना आहेत :

- तुम्ही श्रीगुरुमाईंच्या नववर्ष संदेशाच्या प्रत्येक शब्दाचा अर्थ आणि ते शब्द जे काही प्रकट करत आहेत त्याच्या संपूर्ण आकलनाचे अध्ययन व त्यावर मननचिंतन करू शकता.
- तुम्ही आपल्या जीवनाच्या विभिन्न पैलूंवर मननचिंतन करू शकता — या गोष्टीवर की, श्रीगुरुमाईंचा नववर्ष संदेश या पैलूंवर कशा प्रकारे लागू होतो आणि त्या व्यावहारिक मार्गांवरदेखील मननचिंतन करू शकता, ज्यांच्या माध्यमातून तुम्ही नववर्ष संदेश तुमच्या जीवनात कार्यान्वित करू शकता.
- तुम्ही ध्यान करत असताना श्रीगुरुमाईंच्या नववर्ष संदेशाविषयीच्या अंतर्दृष्टींसाठी प्रार्थना करू शकता आणि मग तुम्हाला मिळालेल्या या अंतर्दृष्टींची नोंद तुम्ही तुमच्या जर्नलमध्ये करू शकता व त्यांच्यावर मननचिंतन करू शकता.

नवीन वर्ष जसजसे सरत जाईल, तसतशी अध्ययनाची अनेक साधने सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर उपलब्ध होतील. मी तुम्हाला प्रोत्साहित करतो की, येणाऱ्या आठवड्यांमध्ये व महिन्यांमध्ये तुम्ही सिद्धयोग मार्गाची वेबसाइट पाहत राहावी आणि जसजशी अध्ययनाची ही साधने तुम्हाला मिळतील, तसतसे तुम्ही त्यांच्यावर कार्य करत राहावे.

**श्रीगुरुमाईंची संदेश-कलाकृती अनुभवणे**

ज्या प्रकारे गुरुमाई दरवर्षी त्यांचा संदेश प्रतीकात्मक स्वरूपाद्वारेदेखील व्यक्त करतात, ती रीत मला अतिशय आवडते. 'श्रीगुरुमाई के संदेश की कलाकृती'वर मननचिंतन करणे आणि त्याचे रसास्वादन करणे मला आश्चर्यचकित करते आणि हे मला श्रीगुरुमाईंच्या संदेशाचे ते पैलू शोधण्यास मदत करते ज्यांचा शोध अन्यथा मी कदाचित घेऊ शकलो नसतो. माझ्यासाठी संदेश-कलाकृती उपमांच्या व मानसचित्रणाच्या त्या भाषा बोलते, ज्यांमध्ये संदेशातील ते सारगर्भित बारकावे आणि त्या गहनता स्पष्ट होतात, ज्यांना कुठल्याही बोलीभाषेत व्यक्त करणे शक्य नाही. 'श्रीगुरुमाई के वर्ष २०२० के संदेश की कलाकृती'चा अनुभव घेण्यासाठी आणि त्यावर मननचिंतन करण्यासाठी आणि या 'संदेश की कलाकृती'ला तुम्ही स्वतःच्या अस्तित्वात स्पंदित होऊ द्यावे यासाठी मी तुम्हाला प्रोत्साहित करतो.

**जानेवारी महिन्यात साजरे केले जाणारे उत्सव**

७ जानेवारीला त्या दिवसाची ४८वी वर्षगाठ आहे, ज्या दिवशी आश्रमाच्या दिनचर्येचा एक भाग म्हणून श्रीगुरुगीता पठणाचा शुभारंभ झाला होता. तुम्ही स्वामी शांतानंद यांच्याद्वारे लिखित 'सिद्धयोग पथ पर श्रीगुरुगीता के महत्त्व' यावरील भाष्य वाचू शकता आणि या पावन ग्रंथाच्या पठणाचा इतिहास आणि त्याचे महत्त्व यांविषयी अधिक माहिती प्राप्त करू शकता.

मकरसंक्रांत हा भारतातील तो सण आहे, ज्या दिवशी कापणीच्या हंगामाचा महोत्सव साजरा केला जातो तसेच या दिवशी सूर्य देवतेची आराधना केली जाते. मी तुम्हाला प्रोत्साहित करतो की, ध्यानासाठी स्वतःला तयार करण्याची एक रीत म्हणून तुम्ही 'सूर्य-गायत्री' मंत्रांच्या संकीर्तनात निमग्न व्हावे. हा सण म्हणजे उत्तर गोलार्धातील प्रकाशपर्वाच्या पारंपारिक आरंभाचा संकेत आहे. या वर्षी मकरसंक्रांत भारतामध्ये १५ जानेवारी रोजी साजरी केली जाईल आणि इतर अनेक ठिकाणी ती १४ जानेवारीला साजरी केली जाईल.

'गणेश जयंती' हा आणखी एक उत्सव या महिन्यात साजरा केला जाईल; जो भारतातील महाराष्ट्र राज्यात भगवान गणेशाच्या जन्मोत्सवाच्या स्वरूपात साजरा केला जातो. भगवान गणेश, ज्यांची त्यांच्या विवेक, प्रज्ञान आणि करुणा यांसाठी ख्याती आहे आणि त्यांना विघ्नहर्ता या नावाने जाणले जाते. मी आणि माझी पत्नी नेहमीच 'मंगलदाता कृपासिंधू' हे संकीर्तन गाऊन भगवान गणेशांची उपासना करतो. 'गणेश जयंती' या वर्षी २८ जानेवारीला आहे.

त्याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजेच २९ जानेवारीला वसंतपंचमी आहे. हा उत्सव महासरस्वतीच्या जन्मदिनाप्रित्यर्थ साजरा केला जातो. देवी सरस्वती विद्या, संगीत आणि कला यांची देवता आहे. भारतात वसंतपंचमीला वसंतऋतुच्या आगमनाचे स्वागत केले जाते.

***

अलीकडेच मला ज्या अंतर्दृष्टीची झलक मिळाली, तिचा उल्लेख करून मी समापन करू इच्छितो. एके दिवशी माझ्या ध्यानाच्या खोलीत पूजावेदीच्या समोर बसलेलो असताना, माझ्या साधनेतील सखोलतेसाठी मला अंतर्दृष्टी प्राप्त व्हावी अशी प्रार्थना मी केली. अचानक माझ्या मानसपटलावर एक चित्र झळकले आणि ते होते अमेरिकेच्या कोलोरॅडो राज्यात स्थित असलेल्या बोल्डर शहराच्या एका मुख्य चौकाचे दृश्य — म्हणजेच तो चौक ज्याचे नाव आहे ब्रॉडवे आणि कॅनियन बूलेवार्ड. मी गोंधळून

गेलो. गेली चाळीस वर्षे मी त्या शहरात राहतो आहे आणि एक व्यस्त चौक मला माझ्या साधनेतील अंतर्दृष्टी कशा प्रकारे प्रदान करू शकतो ?

तरीदेखील, एक गोष्ट मात्र माझ्या लक्षात आली की, ते दृश्य म्हणजे माझ्या अंतर्दृष्टीने मला दिलेला एक उपहार होता आणि म्हणून या दोन मार्गांविषयी मी अधिक सूक्ष्मतेने विचार करू लागलो. मी याचे स्मरण केले की, हा ब्रॉडवे नामक मार्ग आजुबाजूच्या परिसरातून, कार्यालयांमधून आणि शॉपिंग मॉल्स्मधून कशा प्रकारे उत्तरेकडून दक्षिणेकडे जातो आहे, ज्यावेळी कॅनियन बूलेवार्ड नामक रस्ता संपूर्ण बोल्डर कॅनियन शहराला पार करत पश्चिम दिशेकडे पीक टू पीक हायवेपर्यंत जातो, जिथे पर्यटक कोलोरॅडो रॉकीज् नामक पहाडांवरील दिमाखदार व दुर्जेय हिमाच्छादित शिखरांना अगदी जवळून पाहू शकतात. एकाएकी मला ही समज मिळाली की, या दोन मार्गांना आपण आपल्या जीवनाच्या दोन क्षेत्रांची रूपके मानू शकतो — आपले दैनंदिन जीवन आणि अंतरात्म्याचे अलौकिक जीवन.

मी हे पाहिले की, सिद्धयोग साधना करणे कशा प्रकारे या दोन मार्गांना एकत्र आणून आपले रूपांतरण करते : आपण ध्यान करतो आणि ध्यानातील प्रशांतीला आणि एकाग्रतेला आपल्या यात्रेवर आणि आपल्या दैनंदिन जीवनात आपल्यासमवेत घेऊन जातो; आपण नामसंकीर्तन करतो आणि भगवन्नामाच्या स्पंदनांना आपण किराणा माल खरेदी करताना व त्याच्या बीलिंगसाठी रांगेत उभे असताना आपल्यासमवेत घेऊन जातो. उदाहरणे काही कमी नाहीत! मला हृदयापासून असे लक्षात आले की, सिद्धयोग साधना कशा प्रकारे आपले जीवन रूपांतरित करते : आपण याचा अनुभव घेतो की, आपण म्हणजे जीवात्मा आणि परमात्मा यांचा एक जिवंत संगम आहोत.

मी तुम्हाला प्रोत्साहित करतो की, या नववर्षात पदार्पण करत असताना तुम्ही श्रीगुरुमाईंच्या वर्ष २०२०च्या संदेशाला आपल्या हृदयात, मनात आणि कृतींमध्ये सक्रिय रूपाने आपलेसे करून या सत्याच्या अनुभूतीमध्ये मुदित व्हावे.

आदरपूर्वक,

पॉल हॉकवुड

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.